# शिवरायांनी वतन पद्धतीऐवजी वेतन पद्धतीचा अवलंब करून प्रशासनात शिस्त निर्माण केली - डॉ. उल्हास माळकर

छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेल्या राज्यरचनेत शेती, महसूल, व्यापार व शेतकऱ्यांच्या कल्याणावर विशेष लक्ष दिले. शिवरायांनी वतन पद्धतीऐवजी वेतन पद्धतीचा अवलंब करून प्रशासनात शिस्त निर्माण केली. महसूल व्यवस्थेत शेतसारा सुसंगत ठेवून शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण केले. असे मत प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित कन्या महाविद्यालय मिरज येथील प्राचार्य डॉ. उल्हास माळकर यांनी व्यक्त केले.  श्री ना. बा. एज्युकेशन सोसायटी संचलित श्री व्यंकटेश महाविद्यालयात अर्थशास्त्र विभागाच्या वतीने उदघाटन सोहळ्यासाठी "छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांचे आर्थिक धोरण"    विषयावर विशेष व्याख्यान आयोजित केले होते त्यावेळी ते बोलत होते. डॉ. माळकर यांनी पुढे म्हणाले की, शिवरायांचा पराक्रम केवळ रणांगणापुरता मर्यादित नव्हता. त्यांनी अर्थकारणाला बळकट करून स्वराज्याला स्वावलंबी केले. याची दखल तत्कालीन परकीय प्रवासी व लेखकांनी घेतली असून हिंदुस्तानात आर्थिक स्वराज्याचा आदर्श निर्माण झाला. तसेच संभाजी महाराजांविषयी बोलताना त्यांनी नमूद केले की, "छत्रपती संभाजी राजे हे शिवरायांची छबी होते. त्यांनी पराक्रमाबरोबरच शेती विकास, सिंचन सुधारणा, व्यापार वृद्धी व उद्योगधंद्यांना चालना देण्यावर भर दिला. त्यांच्या अल्पशा कारकिर्दीतही हिंदुस्तानाला मजबूत आर्थिक पायाभूत रचना देण्याचे कार्य त्यांनी केले. शिवराय- संभाजीराजांची नीती केवळ महाराष्ट्रापुरती मर्यादित नव्हती तर संपूर्ण हिंदुस्तानाला मार्गदर्शक ठरली. त्यांच्या कार्यामुळे हिंदुस्तानातील सामान्य जनतेला न्याय, सुरक्षितता आणि आर्थिक स्थैर्य मिळाले, ज्याचा आदर्श आजही भारतास लागू होतो. देशांतर्गत व परदेशी व्यापार वाढवण्यासाठी सुरक्षित बंदरे, समुद्रसेना व व्यापार मार्गांची उभारणी हा त्यांच्या धोरणाचा महत्त्वपूर्ण भाग असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमास आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज ,पलूसचे प्रो. डॉ. अनिल पाटील , नाईट कॉलेजचे प्राचार्य डॉ. विरुपाक्ष खानाज, खांडेकर सर आदी मान्यवर उपस्थित होते. अध्यक्षस्थानी प्राचार्यांनी भाषण करताना छत्रपतींच्या अर्थनीती व सद्य भारतीय अर्थव्यवस्था यातील साम्य दाखवून बदलत्या काळात पुन्हा शिवकालीन मूल्यांची गरज व्यक्त केली. कार्यक्रमाची प्रस्तावना विभागप्रमुख श्री डी. बी. पवार यांनी केली. डॉ. एस. आर. ठाकर यांनी प्रमुख अतिथींची ओळख करून दिली. आभार प्रदर्शन डॉ. डी. एस. कांबळे यांनी केले, तर सूत्रसंचालन कु. मोहीनी आंचलिया यांनी केले. विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित राहून व्याख्यान ऐकले आणि स्फूर्ती घेतली.


श्री व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी.
अर्थशास्त्र मंडळ
"छ. शिवाजी महाराज व छ. संभाजी महाराज यांचे आर्थिक धोरण"
Shri N.B.Education Society's
Shri Venkatesh Mahavidyalaya,